# श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती

## सूचना

## विद्यापीठ ऑनलाईन परीक्षा

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांच्या सर्व परीक्षा महाविद्यालयाला घ्यायच्या आहेत. यासंबंधी विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण सूचना -

१. आपल्या सर्व परीक्षा (Theory and Practical) (Regular and Backlog) ऑनलाइन पद्धतीने पार पडणार आहेत.

२. प्रात्यक्षिक परीक्षा १५ ते २५ सप्टेंबर २०२० दरम्यान मौखिक पद्धतीने फोनवरून घेण्यात येतील. संबंधित विषयाचे शिक्षक आपल्याशी फोन वर बोलून परीक्षा घेतील. म्हणून आपला सुरू असलेला मोबाईल क्रमांक गार्डीयन टीचर कडे पाठवावा.

३. थिअरी परीक्षा ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात विद्यापिठ ऑनलाइन पद्धतीने घेणार आहे. आपल्याला ही परीक्षा घरूनच द्यायची आहे. त्यासाठी आपणाजवळ स्मार्टफोन आणि इंटरनेट आवश्यक आहे. विद्यापीठाच्या वेळापत्रकानुसार आपण तशी तयारी ठेवावी.

४. आपल्याला ऑनलाइन पद्धतीने थिअरी परीक्षा देण्यासाठी सुविधा उपलब्ध नसल्यास, फक्त अशा विद्यार्थ्यांसाठीच प्रत्यक्ष (ऑफलाईन) परीक्षा घेण्यात येईल. आपण तसे दिनांक २० सप्टेंबर पर्यंत महाविद्यालयास कळविणे गरजेचे आहे. यासाठी आपल्याला महाविद्यालयात येऊन प्रत्यक्ष परीक्षा द्यावी लागेल. आपल्या गार्डीयन टीचर कडे खालील माहिती द्यायची आहे -

नाव, परीक्षा व सत्र, विषयांची नावे (Regular and Backlog अशी सर्व माहिती)

**(फक्त सुविधेअभावी ऑफलाईन परीक्षा देण्याऱ्या विद्यार्थ्यांनीच हि माहिती द्यायची आहे)**

५. जर आपल्याला आपल्या गावाजवळच्या महाविद्यालयात ही प्रत्यक्ष परीक्षा (ऑफ लाईन) द्यायची असल्यास त्या महाविद्यालयाचे नाव देखील कळवायचे आहे.

६. आपल्याला ऑनलाइन परीक्षा देण्यात अडचण नसल्यास कळविण्याची गरज नाही.

इतर माहितीसाठी आपण महाविद्यालयात आपल्या गार्डीयन टीचरशी संपर्क साधावा. तसेच वेळोवेळी येणाऱ्या सूचनांसाठी महाविद्यालयाच्या वेबसाइट वर तसेच समुपदेशन केंद्राच्या (Students' Counselling Centre) संपर्कात राहावे.

SHRI SHIVAJI SCIENCE COLLEGE NAAC Re-Accredited with 'A' Grade AMRAVATI

**दिनांक: १५ सप्टेबर २०२०**

**प्राचार्य**
**श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय,**
**अमरावती**

Created by Universal Document Converter